**MAHARASHTRA ADMINISTRATIVE TRIBUNAL**

**NAGPUR BENCH NAGPUR**

**ORIGINAL APPLICATION NO.271/2017(S.B.)**

Sau. Sadhana Roshan Gajbhiye,
Aged about 46 years, Occ. Household, R/o Mohadi Mokasa,
Tah. Nagbhid, Dist. Chandrapur

**Applicant.**

**Versus**

1) State of Maharashtra,
through its Secretary,
Home Ministry,
Mantralaya, Mumbai.
2) District Collector, Chandrapur.
3) The Sub-Divisional Officer,
Bramhapuri, Tah. Bramhapuri, Dist. Chandrapur.
4) Mahatma Gandhi Tanta Mukti Samiti,
Through its President, R/o Grampanchayat Mohadi (Mokasa),
Tah. Nagbhid, Dist. Chandrapur. (Deleted)

**Respondents**

---

Shri P.N.Warjukar, Ld. Counsel for the applicant.
Shri A.P.Potnis, Ld. P.O. for the respondents.

---

**Coram:- Hon'ble Shri M.A.Lovekar, Member (J).**
**Dated: - 16th July, 2024.**

---

**JUDGMENT**

**Judgment is reserved on 10th July, 2024.**

**Judgment is pronounced on 16th July, 2024.**

Heard Shri P.N.Warjukar, learned counsel for the applicant and Shri A.P.Potnis, learned P.O. for the respondents.

2. The applicant was appointed as Police Patil of village Mohadi (Mokasa), Tahsil Nagbhid, District Chandrapur initially from 10.04.2006 to 09.04.2011 and thereafter from 10.04.2011 to 09.04.2016. She had submitted an application on 08.03.2016 for further extension / renewal. Though, after 09.04.2016 her tenure was not extended, she was placed under suspension by order dated 19.05.2016. She challenged this order in O.A.No.404/2016. The O.A. was disposed of by Judgment dated 15.02.2017 by observing that on the date of suspension i.e. 19.05.2016 the applicant was not holding the post of Police Patil as her tenure had come to an end on 09.04.2016. By the impugned order dated 07.04.2017 (Annexure A-1) her application dated 08.03.2016 for renewal / extension was rejected. Hence, this O.A..

3. The impugned order reads thus-

> श्री. साजेश महादेव गेडाम अध्यक्ष महात्मा गांधी गांव तंटामुक्त समिती मोहाळी मो. ता. नागभिड जि. चंद्रपुर यांनी दिनांक 20.7.2015 रोजी तक्रार दाखल करुन मौजा मोहाळी (मो) येथील पोलीस पाटील पदाचा दुरुपयोग करीत असल्यामुळे सदर पोलीस पाटील पदाचा पद रद्य करण्याबाबत विनंती केलेली होती. सदर तक्रारीची चौकशी सुरु असतांना सौ. साधना रोशन गजभिये पोलीस पाटील मोहाळी (मो) यांनी दिनांक 8.3.2016 रोजी पोलीस पाटील पदाचे पुढील कालावधी करीता नुतणीकरण करुन मिळणेबाबत विनंती केलेली होती. सदर

विनंती अर्जानुसार पोलीस स्टेशन अधिकारी नागभिड यांचेकडुन चौकशी अहवाल मागविण्यांत आलेला होता.

प्रस्तुत प्रकरणांत उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपुरी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. एपीएसपी/वरिष्ठ अर्ज / 70/15 अहवाल-2993 दिनांक 3.10.2015 अन्वये चौकशी अहवाल सादर केलेला तसेच पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नागभिड यांनी अहवाल दिनांक 17.10.2015 नुसार सदर पोलीस पाटील यांचे कार्यकाळातील कामकाज समाधानकारक दिसून न आल्याने त्यांचे पोलीस पाटील परवाना नुतणीकरण न करता पोलीस पाटील पद रद्य करण्याबाबत अहवाल सादर केल्याने तसेच सदर पोलीस पाटील यांचे तक्रारीचे अनुषंगाने चौकशी सुरु असल्याने सौ. साधना रोशन गजभिये यांचे पोलीस पाटील पदाचे नुतनीकरण करण्याबाबतची बाब स्थगीत ठेवण्यांत आलेली होती. तसेच तहसिलदार नागभिड यांनी त्यांचे दिनांक 17.11.2015 चे अहवालानुसार पोलीस पाटील सौ. साधना रोशन गजभिये हया तंटामुक्त समितीचे सभेस गैरहजर राहतात हे सिध्द झाल्याचे कळविलेले आहे.

सौ. साधना रोशन गजभिये पोलीस पाटील मोहाळी (मो) यांचे तक्रारीचे अनुषंगाने चौकशी अधिकारी स.पो.नि.श्री.व्ही.एस.सोनवणे पो.स्टे. नागभिड यांनी तसेच तहसिलदार नागभिड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार व त्याआधारे या कार्यालयात घेण्यांत आलेले बयानावरुन त्यांना या कार्यालयाचे आदेश दिनांक 19 मे 2016 रोजी महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 चे कलम 11 अन्वये पोलीस पाटील पदावरुन निंलबित करण्यांत आले.

सौ. साधना रोशन गजभिये (निलंबित) पोलीस पाटील यांनी या कार्यालयाचे दिनांक 19.5.2016 चे पारित आदेशाविरुध्द दिनांक 20.6.2016 रोजी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ नागपूर येथे अपील अर्ज क्रमांक 404/2016 दाखल केलेला होता. सदर अपील अर्जावर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ नागपुर यांनी दिनांक 15.2.2017 रोजी आदेश पारीत केलेला आहे.

मा. महाराष्ट्र प्रशासकीय, न्यायाधिकरण खंडपिठ नागपूर यांचे दिनांक 15.2.2017 चे आदेशानुसार अर्जदार सौ. साधना रोशन गजभिये यांचा पोलीस पाटील पदाचा कार्यकाळ दिनांक 9.4.2016 रोजी संपला असल्याने या कार्यालयाचे निलंबन आदेश विफल (infructuous) होतो. मा. महाराष्ट्र

प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपिठ नागपूर यांनी तंटामुक्त समितीने सौ.साधना रोशन गजभिये यांचे विरुध्द केलेले आरोप किंवा तटांमुक्त समितीवर सौ. साधना रोशन गजभिये यांनी केलेले प्रत्यारोप हयांचे खरेपणाबद्यल कोणतेही भाष्य केलेले नाही व त्याप्रमाणे खंडपीठासमोरील मुळ अर्ज क्रमांक 404/2016 निकाली काढण्यांत आलेला आहे. त्यामुळे अर्जदार सौ. साधना रोशन गजभिये यांचे पोलीस पाटील पदाचे नुतणीकरण पुढील कालावधीसाठी करणेबाबत चे दिनांक 8.3.2016 चे अर्जावर निर्णय देण्यासाठी पुढील कार्यवाही करणेकरीता कोणतीही बाधा उरलेली नाही.

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ नागपूर यांनी दिनांक 15.2.2017 रोजी पारित केलेल्या आदेशानुसार सौ. साधना रोशन गजभिये (निलंबित) पोलीस पाटील यांचे प्रकरणांत दिनांक 23.3.2017 रोजी सर्व संबंधीताचे बयान नोंदविण्यांत आले. त्यानुसार साक्षदार क्रमांक 1 श्री.देवराव गोविंदा बन्सोड वय 65 वर्षे यांची साक्ष नोंदविण्यांत आली. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कबूल केले की, तंटामुक्ती समितीसमोर त्यांचे तंट्याबाबत समझोता झाल्यानंतर दिनांक 5.6.2012 रोजी सांयकाळी 4.00 वाजता नागभिड येथे पोलीस पाटील सौ. साधना रोशन गजभिये यांचे पतीने त्यांना बोलाविले. 50000/- रुपयांची मागणी केली व 5000/- रुपये पोलीस केस न करण्याकरीता स्विकारले. मात्र सौ. साधना रोशन गजभिये यांनी कधीही पैशाची मागणी केली नाही असे साक्षीमध्ये मान्य केले.

श्रीमती कौसल्याबाई पुंजाराम बाघ हया दुसऱ्या साक्षदाराने त्यांचे साक्षीत असे सांगितले की त्यांना सौ. साधना रोशन गजभिये हिचे पतीने 500/- रुपये सन 2009 मध्ये मागितले होते. मात्र तक्रार सहा वर्षाने कां केली त्याचे कारण सांगितलेले नाही. तसेच सौ. साधना रोशन गजभिये हयांनी पैशाची मागणी केली नसल्याचे उलट तपासणीत मान्य केले.

श्री. साजेश महादेव गेडाम तंटामुक्ती समितीचे सन 2014 पासून अध्यक्ष असून त्यांनी त्यांचे साक्षीत असे सांगितले की, दिनांक 20.7.2015 चे तंटामुक्ती समितीमध्ये श्री.देवराव गोंविदा बन्सोड व श्रीमती कौसल्याबाई पुंजाराम वाघ यांचे सौ.साधना रोशन गजभिये हयांचे विरुध्द चे तक्रार अर्जानुसार समितीने ठराव पारित केला. सौ. साधना रोशन गजभिये हया कोणत्याही तंटा मिटविण्यासाठी येत नाहीत. पदाचा गैरवापर

करुन पतीमार्फत पैसे घेतल्याचे तक्रारीवर निर्णय घेण्यापुर्वी पुरावे तपासले नाही असे मान्य करतात. तसेच साक्षदार उलटतपासणी मध्ये हे मान्य करतो की, पोलीस पाटील यांना वेळोवेळी नोटीस दिले जाते. दिनांक 11.11.2014 पासून झालेल्या तंटामुक्त समितीचे सभेस सौ. साधना रोशन गजभिये हया कधीही हजर झालेल्या नाहीत.

सौ. साधना रोशन गजभिये यांची साक्ष नोंदली. त्यांनी आपले साक्षीत हे मान्य केले की, तंटामुक्ती समितीचे सभेचे इत्तीवृत्त दाखविले असता दिनांक 21.11.2008 चे इत्तीवृत्तावर त्यांची स्वाक्षरी नसल्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे दिनांक 30.11.2008, 11.12.2008, 12.6.2009, 13.6.2009, 29.10.2010, 26.3.2013 चे तंटामुक्ती समितीचे सभेचे इत्तीवृत्तावर त्यांची स्वाक्षरी आहे. तसेच त्यांनी साक्षीत हे कबूल केले की, दिनांक 26.3.2016 नंतर झालेल्या कोणत्याही तंटामुक्ती समितीचे सभेचे इत्तीवृत्तावर त्यांची स्वाक्षरी नाही. त्यांना सन 2013 नंतर सभेचे नोटीस दिलेले नाही. साक्षदार त्यांचे उलटतपासात हे मान्य करतो की, श्री.साजेश महादेव गेडाम यांचे कर्तव्यकाळाचे पुर्वी त्यांनी सभेस हजर असूनही अनावधाने इत्तिवृत्ताचे बुकावर सही केलेली नाही.

वरील परिस्थितीत सौ.साधना रोशन गजभिये यांचे विरुध्दचे आरोपावरील माझा निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

**आरोप क्रमांक 1:-** सौ.साधना रोशन गजभिये हयांनी श्री. देवराव बन्सोड व श्रीमती कौसल्याबाई वाघ हयांचे तंटामुक्ती समिती समोरील तंटे सोडविणेसाठी प्रत्यक्ष पैशाची मागणी करुन पैसे स्विकारले नसले तरी पती श्री. रोशन गजभिये राजकीय पक्षाचे प्रतिनिधी असून त्यांचे मार्फत पैसे स्विकारले हा आरोप अंशतः सिध्द होतो.

**आरोप क्रमांक 2:-** सौ.साधना रोशन गजभिये हया तंटामुक्ती समितीसमोर गैरहजर राहतात. पोलीस निरीक्षक यांचे दिनांक 17.10.2015 चा अहवाल तहसिलदार नागभिड यांचा दिनांक 17.11.2015 चा अहवाल ग्रामसभेचा ठराव तसेच साक्षदार श्री. साजेश महादेव गेडाम व सौ.साधना रोशन गजभिये यांची साक्ष यावरुन सौ. साधना रोशन गजभिये हया दिनांक 26.3.2011 पासुन तंटामुक्ती समितीचे सभेस सतत गैरहजर राहिलेल्या आहे. शासन निर्णय दिनांक 14.8.2014 नुसार पोलीस पाटील हे तंटामुक्त समितीच्या निमंत्रक असतात. सौ. साधना रोशन गजभिये हया 26.3.2011 पासून तंटामुक्ती समितीचे

सभेस गैरहजर असल्याने त्यांचे पदाचे कर्तव्य त्यांनी पार पाडलेले नाही. त्यामुळे सौ. साधना रोशन गजभिये हयांचे विरुध्दचा हा आरोप सिध्द होतो.

त्यामुळे वरिल परिस्थितीत सौ.साधना रोशन गजभिये हयांची मोहाळी (मोकासा) तहसिल नागभिड जिल्हा चंद्रपुर येथील पोलीस पाटील पदाचे दिनांक 9.4.2016 ते पुढील पाच वर्षाचे कालावधी करीता नुतनीकरण करण्याबाबतचा दिनांक 8.3.2016 चा अर्ज याद्वारे फेटाळण्यांत येतो.

4. It was submitted by learned P.O. that since allegations against the applicant were satisfactorily proved, the impugned order deserves to be sustained.

5. While passing the impugned order respondent no.3 considered the evidence on record and drew conclusions which are based thereon. He concluded that husband of the applicant had accepted gratification and the applicant used to remain absent in meetings of Tantamukti Committee. In this background the impugned order which is passed on the basis of appreciation of evidence cannot be interfered with. The O.A. is dismissed with no order as to costs.

(M.A.Lovekar)
Member (J)

Dated – 16/07/2024
rsm.

I affirm that the contents of the PDF file order are word to word same as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Raksha Shashikant Mankawde |
| Court Name | : | Court of Hon'ble Member (J). |
| Judgment signed on and pronounced on | : | 16/07/2024. |
| Uploaded on | : | 18/07/2024. |